शुभवार्ता

## ‘मेट्रो-३’चे निम्मे भुयारीकरण पूर्ण



मुंबई : कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ या भूमिगत प्रकल्पाने एक महत्त्वाचा टप्पा पार केला असून, या मार्गाचे ५० टक्के भुयारीकरण पूर्ण झाले आहे. केवळ १९ महिन्यांत एकही अपघात न होता हा पल्ला गाठण्यात आला आहे.

➤ वृत्त...२

# निम्मे भुयारीकरण पूर्ण

## कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३चा महत्त्वाचा टप्पा केवळ १९ महिन्यांत पूर्ण

**म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई**

कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ या भूमिगत प्रकल्पाने एक महत्त्वाचा टप्पा पार केला असून या मार्गाचे ५० टक्के भुयारीकरण पूर्ण झाले आहे. केवळ १९ महिन्यांत एकही अपघात न होता हा पल्ला गाठण्यात आला आहे.

या मार्गासाठी एकूण ५६ किमी (अप आणि डाऊन) लांबीचे भुयारीकरण करायचे आहे. मेट्रो-३ हा मुंबईच नव्हे तर भारतातील सर्वात लांबीचा भुयारी मेट्रो मार्ग आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सप्टेंबर २०१७ मध्ये नयानगर लॉचिंग शाफ्टमध्ये कृष्णा-१ हे टीबीएम उतरविल्यानंतर ६ नोव्हेंबर २०१७ पासून प्रत्यक्ष भुयारीकरणाला सुरुवात झाली. भुयारीकरणाचा पहिला टप्पा सप्टेंबर २०१८ मध्ये पार पडला. त्यानंतर केवळ आठ महिन्यांत एकूण १२ टप्पे पार पडले आहेत. आतापर्यंत सीप्झ येथे एक, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टी-२ येथे दोन, सहार, एमआयडीसी, वरळी आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे प्रत्येकी एक, तर दादर, विद्यानगरी आणि विधानभवन येथे दोन अशा प्रकारे भुयारीकरणाचे एकूण १३ टप्पे पार पडले आहेत.



### उर्वरित भुयारीकरण १९ टप्प्यांत

‘एकूण भुयारीकरणापैकी आजवरचा सर्वांत मोठा भुयारीकरणाचा टप्पा विद्यानगरी ते आंतरदेशीय विमानतळ (३.९ किमी) हा असून सर्वांत लहान टप्पा सारिपूत नगर ते सीप्झ (५६२ मीटर) हा आहे. एकूण ३३.५ किमीच्या मार्गिकेवरील उर्वरित ५० टक्के भुयारीकरण आणखी १९ टप्प्यांत पूर्ण होईल’, अशी माहिती प्रकल्प संचालक एस. के. गुप्ता यांनी दिली.



टीबीएम यंत्रे भूगर्भात उतरविण्यासाठी कफ परेड, इरॉस सिनेमा, आझाद मैदान, सायन्स म्युझियम, सिद्धिविनायक, नयानगर, बीकेसी, विद्यानगरी, पाली मैदान, सारिपुत नगर, सहार रोड आणि छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टी-२ येथे लॉचिंग शाफ्ट बांधण्यात आले आहेत.

‘मुंबईतील अतिशय जुन्या इमारती, मिठी नदी आणि उन्नत मुंबई मेट्रो-१ याखालून भुयारीकरण करणे जिकिरीचे आहे. सुरक्षेबाबत तडजोड न करता सुरक्षेच्या सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करून आम्ही हे काम पूर्ण केले आहे. या यशात प्रकल्प सल्लागार, कंत्राटदार या सर्वांचा सहभाग आहे’, अशी प्रतिक्रिया मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी दिली. मुख्यमंत्र्यांच्या वॉर रूमद्वारे नियमितपणे घेतला जाणारा आढावा, विविध भागीदारी संस्थांचे सहकार्य आणि मुंबईकरांच्या भक्कम पाठिंब्यामुळे हा प्रकल्प वेळेत पूर्ण करू, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.